**नियमित दिवाणी दावा क्र-०१/२०१३**
**निशाणी ७९ लगत**

**प्रतिवादीचा जादा सरतपास शपथेवर विधीज्ञ श्री. एस. एस. कासलीवाल यांचेतर्फे सुरु -**

दि. २४.०२.२०२५ रोजी माझ्या आईने माझ्या लाभात मुख्त्यार पत्र लिहून दिले आहे. त्यावर लिहून देणार म्हणून माझ्या आईची सही असून लिहून घेणार म्हणून माझी सही आहे. सदरचे वट मुख्त्यार पत्र हे नोटरी केलेले आहे. मी ते स्विकारलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ८०** देण्यात येते. माझे आजोबांनी माझे आईचे लाभात दि. १९.०८.१९८० रोजी लिहून दिलेले अस्सल खरेदीखत मी निशाणी ६४/२ वर दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा दस्त हा माझे आजोबा तुळशीराम चिमाजी गिते यांनी लिहून दिलेला आहे. त्यावर माझ्या आजोबांची सही आहे. ती मी ओळखतो. ( वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. आर. चौधरी यांनी प्रस्तुतचा साक्षीदार हा केवळ वट मुख्त्यार असून तो सदर दस्तास पार्टी नाही त्यामुळे सदर साक्षीदारास प्रस्तुतचा दस्त शाबीत करता येणार नाही अशी हरकत घेतली. याउलट प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कासलीवाल यांनी प्रस्तुतचा दस्त हा तीस वर्षापेक्षा जुना असल्याने व तो प्रतिवादींच्या ताब्यातून आला असल्याने त्यास निशाणी देता येईल असे सांगितले. सदर हरकत ही दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल व प्रस्तुतचे दस्तास निशाणी देण्यात येत आहे. ) सदर खरेदी दस्तास **निशाणी क्र. ८१** देण्यात आला.

**जादा सरतपास – पुर्ण.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत, | माझे समक्ष, |
| sd/- | sd/- |
| (जे.एम.अग्निहोत्री) | (जे.एम.अग्निहोत्री) |
| दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, | दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, |
| नांदगाव | नांदगाव |

दिनांक - १८.०३.२०२५.